**ग्रामीण कृषी मौसम सेवा**

भारत मौसम विभाग

प्रायोगिक ब्लॉक लेव्हल ॲग्रोमेट ॲडव्हायझरी बुलेटिन

(आयएमडी आणि आयसीएआर चा संयुक्त उपक्रम)

# हवामानावर आधारीत कृषि सल्ला

**दिनांक : 22-10-2024**

**नागपूर(महाराष्ट्र) मध्ये कुही ब्लॉक करा साठी हवामान पूर्वानुमान - वर जारी :2024-10-22 ( पुढील पाच दिवसांसाठी सकाळी ८:३० वाजेपर्यंत वैध)**

| हवामान घटक | 2024-10-23 | 2024-10-24 | 2024-10-25 | 2024-10-26 | 2024-10-27 |
|---|---|---|---|---|---|
| पर्जन्यमान (मिमी) | 0.1 | 0.1 | 0.1 | 0.1 | 0.1 |
| कमाल तापमान (अं.से) | 31.7 | 32 | 31.4 | 31.7 | 32.6 |
| किमान तापमान (अं.से) | 21.7 | 21.1 | 20.4 | 20.6 | 21.7 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 80.2 | 70.9 | 69.2 | 71.2 | 71.8 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (टक्के) | 40.7 | 35.4 | 41.1 | 39.3 | 36.5 |
| वाऱ्याचा वेग(किमी/तास) | 5.8 | 6.5 | 7.6 | 7.2 | 8.3 |
| वाऱ्याची दिशा(अंश) | 21.8 | 3.1 | 328.6 | 354.3 | 357.6 |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | 3 | 2 | 5 | 5 | 4 |

## हवामान सारांश / चेतावणी:

• भारतीय हवामान विभाग, प्रादेशिक हवामान केंद्र, नागपूर च्या मूल्यवर्धित अंदाजानुसार, पुढील पाच दिवस दिनांक २३ ते २७ ऑक्टोबर २०२४ दरम्यान आकाश निरभ्र ते आंशिक ढगाळ राहण्याची शक्यता, • दिनांक २७ ऑक्टोबर २०२४ रोजी खूप हलक्या ते हलक्या स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

## कृषि सल्ला:

सामान्य सल्ला: • पुढील ४ दिवस कोरड्या हवामानाचा अंदाज लाक्षेत घेता, सोयाबीन कापणी व मळणी ची कामे, रब्बी हंगामातील पेरणीचे कामे, आंतरमशागतीची कामे, कृषी रसायनांच्या फवारणीची कामे पुढील ४ दिवस सुरु ठेवावी. • कोरडवाहू गहू पिकाची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात करावी. • ओलिताखालील करडी पेरणी ऑक्टोबर च्या अखेरपर्यंत करावी. • बागायती जवस पेरणी ७ नोव्हेंबर पर्यंत करावी. • हरभरा बियाण्यास पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ५ ग्राम ट्रायकोडर्मा किंवा २ ग्राम थायरम + २ ग्राम कार्बेन्डाझिम बीजप्रक्रिया, यानंतर २५० ग्राम रायझोबियम (नत्र स्थिरीकरण करणारे जिवाणू) आणि २५० ग्राम पी. एस. बी. (स्फुरद विरघळविणारे जिवाणू) प्रती १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणात मिसळून बीज प्रक्रिया करावी. बीज प्रक्रिया केल्यानंतर तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी. • हरभरा पिकामध्ये मर व मुळकुज

| |
|---|
| ह्या बुरशीजन्य रोग टाळण्यासाठी बियाण्याला पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी, या बीज प्रक्रियेसाठी टेब्युकोनाझोल ५.४ % w/w एफएस या रासायनिक बुरशीनाशकाची ०.४ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात बुरशीनाशकाची शिफारस केली आहे. • कोरडवाहू गहू पेरणीकरिता एकेडीडब्लू २९९७- १६ (शरद), पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२), एमएसीएस १९६७ आणि एनआय ५४३९. पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२) या वाणाची मर्यादित ओलीत उपलब्ध परिस्थितीमध्ये निवड करावी. बागायती गहू वेळेवर पेरणीसाठी एकेडीडब्लू १०७१ (पूर्णा), एकेडीडब्लू ३७२२ (विमल), एचडी २१८९ आणि एचडी २३८० या वाणाची निवड करावी. बागायती गहू उशिरा पेरणीसाठी पिडीकेव्ही सरदार (एकेएडब्लू ४२१०-६), एकेएडब्लू ४६२७, एकेएडब्लू- ३८१, एकेएडब्लू १०७१ (पूर्णा) आणि एचआय ९७७ या वाणाची निवड करावी. • सोयाबीनचे बियाणे साठवितांना त्यात ओलाव्याचे प्रमाण ८ टक्के पेक्षा जास्त नसावे. १०० किलोच्या पोत्याची ५ पेक्षा मोठी थप्पी लाऊ नये. बियाण्याची पोत्याची आदळ आपट करू नये. |

**संक्षिप्त संदेश सल्ला:**

| |
|---|
| • कोरडवाहू गहू पिकाची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात करावी. |

**पिक निहाय सल्ला:**

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| हरभरा | • हरभरा पिकाचे पेरणी करिता देशी वाण आणि बियाणे दर- हिरवा चाफा (एकेजीएस- १), विजय आणि आयसिसिव्ही- १० (५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर), पिकेव्ही हरिता (एकेजी- ९३०३- १२) आणि जाकी ९२१८ (७५- ८५ किलो बियाणे प्रती हेक्टर बियाणे), काबुली वाण आणि बियाणे दर पिकेव्ही काबुली- २ आणि पिकेव्ही काबुली- ४ (११०- ११५ किलो बियाणे प्रती हेक्टर), गुलाबी हरभरा वाण गुलक- १ (७५-८५ बियाणे प्रती हेक्टर) या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५- ३० नोव्हेंबर पर्यंत पेरणी करावी. पिकेव्ही कांचन (एकेजी- १९०९) या वाणाची ५०-६० किलो बियाणे प्रती हेक्टर या प्रमाणात १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर पर्यंत करावी. • हरभरा बियाण्यास पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास ५ ग्राम ट्रायकोडर्मा किंवा २ ग्राम थायरम + २ ग्राम कार्बेन्डाझिम बीजप्रक्रिया, यानंतर २५० ग्राम रायझोबियम (नत्र स्थिरीकरण करणारे जिवाणू) आणि २५० ग्राम पी. एस. बी. (स्फुरद विरघळविणारे जिवाणू) प्रती १० किलो बियाण्यास गुळाच्या थंड द्रावणात मिसळून बीज प्रक्रिया करावी. बीज प्रक्रिया केल्यानंतर तासभर सावलीत सुकवावे आणि मग पेरणी करावी. • हरभरा पिकामध्ये मर व मुळकुज ह्या बुरशीजन्य रोग टाळण्यासाठी बियाण्याला पेरणीपूर्वी बीजप्रक्रिया करावी, या बीज प्रक्रियेसाठी टेब्युकोनाझोल ५.४ % w/w एफएस या रासायनिक बुरशीनाशकाची ०.४ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात बुरशीनाशकाची शिफारस केली आहे. |
| गहू | • गहू पिकासाठी मध्यम भारी, खोल व पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन निवडावी. गहू पिकासाठी जमीन तयार करताना १५ ते २० सेंमी खोल नांगरणी करावी. वखराच्या २ ते ३ पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. पूर्वीच्या पिकाची धसकटे, काडी कचरा वेचून शेत स्वच्छ करावे. गहू लागवड शक्यतो समपातळीत असावे जेणेकरून पुढील ओलीत व्यवस्थापन करता येईल आवश्यकता भासल्यास जमीन समपातळीत आणण्यासाठी पाटा मारावा. कोरडवाहू गहू पिकाची पेरणी ऑक्टोबर महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात करावी. कोरडवाहू गहू पेरणीस प्रती हेक्टरी ७५ किलो बियाणे वापरावे. कोरडवाहू गव्हाची पेरणी जमिनीमध्ये पुरेसा ओलावा असतानाच करावी आणि पेरलेले बियाणे ओलाव्यात पडेल याची पुरेशी दक्षता घ्यावी. कोरडवाहू वेळेवर पेरणीसाठी दोन ओळीमध्ये २३ सेंमी अंतर ठेवावे. गहू पेरणी वेळी |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | ५ ते ६ सेंमी पेक्षा खोल पडणार नाही याची काळजी घ्यावी. • कोरडवाहू गहू पेरणीकरिता एकेडीडब्लू २९९७- १६ (शरद), पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२), एमएसीएस १९६७ आणि एनआय ५४३९. पिडीकेव्ही वाशीम (डब्लूएसएम- १४७२) या वाणाची मर्यादित ओलीत उपलब्ध परिस्थितीमध्ये निवड करावी. बागायती गहू वेळेवर पेरणीसाठी एकेडीडब्लू १०७१ (पूर्णा), एकेडीडब्लू ३७२२ (विमल), एचडी २१८९ आणि एचडी २३८० या वाणाची निवड करावी. बागायती गहू उशिरा पेरणीसाठी पिडीकेव्ही सरदार (एकेएडब्लू ४२१०-६), एकेएडब्लू ४६२७, एकेएडब्लू- ३८१, एकेएडब्लू १०७१ (पूर्णा) आणि एचआय ९७७ या वाणाची निवड करावी. • गहू बियाण्यास पेरणीपूर्वी अॅझोटोबॅक्टर हे नत्र स्थिरीकरण करणारे जीवाणू संवर्धन आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू खत प्रत्येकी २५० ग्राम प्रती १० ते १२ किलो बियाण्यास लावून बीजप्रक्रिया करावी. • गहू पिकामध्ये बुरशीजन्य रोग आणि किडींचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी पेरणीपूर्वी गव्हाच्या बियाण्याला बीजप्रक्रिया करावी, यासाठी शिफारस केलेले बुरशीनाशक आणि कीटकनाशके पुढीलप्रमाणे आहेत. बंट (Bunt), ध्वज काणी (Flag smut) आणि मोकळी काणी (Loose smut) रोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी कार्बोक्सिन 75 % डब्ल्यूपी @ 2-2.5 ग्रॅम/किलो बियाणे किंवा मोकळी काणी (Loose smut) रोगाचे व्यवस्थापन करण्यासाठी डायफेनोकोनाझोल ३ % डब्ल्यूएस @ २ ग्राम प्रती किलो बियाणे किंवा ध्वज काणी (Flag smut) आणि मोकळी काणी (Loose smut) रोगाच्या व्यवस्थापनासाठी टेब्युकोनाझोल ५.४ % डब्ल्यू/डब्ल्यू एफएस @ ०.३ मिली प्रती किलो बियाणे किंवा मोकळी काणी (Loose smut) रोगाच्या व्यवस्थापनासाठी कार्बोक्सिन ३७.५ % + थायरम ३७.५ % डब्ल्यूएस @ ३ ग्राम प्रती किलो बियाणे किंवा तांबेरा व काणी रोग तसेच वाळवी आणि मावा किडीच्या प्रादुर्भावाचे व्यवस्थापन करण्यासाठी इमिडाक्लोप्रिड १८.५ % + हेक्साकोनाझोल १.५ % एफएस @ ३ मिली प्रती किलो बियाणे या प्रमाणात प्रतिबंधात्मक उपाय म्हणून बीज प्रक्रिया करावी. |
| करडई | • ओलिताखालील करडी पेरणी ऑक्टोबर च्या अखेरपर्यंत करावी. • बियाणे रात्रभर भिजवून पेरणी केल्यास उगवण लवकर व चांगली होते. • पेरणी करताना दोन ओळीतील अंतर ४५ सेंमी ठेवावे. • करडी पिक सलग पिक न घेता आंतरपीक म्हणून हरभरा, जवस पद्धतीमध्ये करडी + हरभरा (६:३) किंवा करडी + जवस (३:३) या प्रमाणात घेता येते. कोरडवाहू करडी पिकास ४० किलो नत्र (१९४ किलो अमोनियम सल्फेट किंवा ८७ किलो युरिया) + २५ किलो स्फुरद (१५६ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) प्रती हेक्टर पेरणीच्या वेळी द्यावे. |
| सोयाबीन | • काढणी केलेले पीक उन्हात वाळल्यानंतर मळणी करावी. मळणी ताबडतोब न केल्यास पावसापासून संरक्षण करून सुरक्षित ठिकाणी साठवून करावी. • पुढील हंगामात बियाणासाठी सोयाबीन चा वापर करावयाचा असल्यास, बियाणे उगवणाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी ३५० ते ४०० आरपीएम या वेगावर थ्रेशरने सोयाबीनची मळणी करावी. • सोयाबीनचे बियाणे साठवितांना त्यात ओलाव्याचे प्रमाण ८ टक्के पेक्षा जास्त नसावे. १०० किलोच्या पोत्याची ५ पेक्षा मोठी थप्पी लाऊ नये. बियाण्याची पोत्याची आदळ आपट करू नये. |
| कपाशी | • कपाशी पिकामध्ये पाते, फुले आणि बोंडे लागण्याच्या अवस्थेत मागील आठवड्यातील उच्च आर्द्रता, ढगाळ हवामान आणि सततच्या पावसामुळे आंतरिक बोंड सड या रोगाचा प्रादुर्भाव आढळून आला आल्यास, व्यवस्थापनासाठी विकसित अवस्थेतील बोन्डाना चिकटलेल्या वाळलेल्या पाकळ्या गोळा करून शेताबाहेर नष्ट कराव्या. नत्रयुक्त खतांचा अतिरिक्त वापर टाळावा. कापूस पिकाच्या अतिरिक्त वनस्पती वाढीस प्रतिबंध करा. पिक क्षेत्रात पाणी साचू नये म्हणून शेतात पाण्याचा निचरा योग्य प्रकारे करावा. या रोगास प्रतिबंधात्मक उपाय म्हणून कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्ल्यूपी २५ ग्राम प्रती १० लिटर पाणी या प्रमाणात १५ दिवसांच्या अंतराने बोंडे विकसित होण्याच्या सुरुवातीच्या फवारणी करावी. शिफारस केलेल्या कीटकनाशकांच्या फवारणीने रस शोषक किडीचे व्यवस्थापन करावे. • मागील |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | आठवड्यातील उच्च आर्द्रता, ढगाळ हवामान आणि सततच्या पावसामुळे कपाशीच्या पिकावर टार्गेट लीफ स्पॉट, अल्टरनेरिया पानावरील ठिपके, मायरोथेसिम पानावरील ठिपके, बाह्य बुरशीजन्य बोंड सड या व्यवस्थापनासाठी रोगप्रतिबंधक फवारणी घेण्याचा सल्ला दिला जातो. प्रोपिनेब ७० डब्ल्यूपी २५-३० ग्राम किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन १८.२ % डब्ल्यू/डब्ल्यू + डायफेनोकोनाझोल ११.४ % डब्लू/डब्ल्यू एससी १० मिली किंवा फ्लूक्सापायरोक्सॅड १६७ g/l + पायराक्लोस्ट्रोबिन ३३३ g/l एससी ६ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम ५० डब्ल्यूपी २० ग्राम किंवा प्रोपीकोनाझोल २५ ईसी १० मिली किंवा पायराक्लोस्ट्रोबिन ५ % + मेटीराम ५५ % डब्ल्यूजी २० ग्राम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • कपाशी मध्ये फुलोरा अवस्थेत २ टक्के युरिया ची आणि बोंडे विकसित होण्याच्या अवस्थेत २ टक्के डीएपी ची फवारणी करावी. • कपाशीमधील नैसर्गिक पाते व फुलगळ टाळण्यासाठी एनएए ४.५ एसएल ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कपाशीमधील अतिरिक्त कायिक वाढीस प्रतिबंध करण्यासाठी मेपीक्वेट क्लोराईड १० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. • कपाशी पिकामध्ये फुलकिडे किडीचा प्रादुर्भाव आढळून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास थायमीथोक्झाम २५ % डब्ल्यूजी २ ग्राम प्रती १० लिटर पाणी (१००ग्राम प्रती हेक्टर) किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ८.४ मिली प्रती १० लिटर पाणी (४२० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. • ज्या ठिकाणी कपाशीचे पिक ६० ते ९० दिवसांचे आहे अशा ठिकाणी तुडतुडे किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास, फ्लॉनिकॅमिड ५० डब्ल्यूजी @ ४ ग्राम प्रती १० लिटर पाणी (२०० ग्राम प्रती हेक्टर)किंवा डिनोटेफुरान २० एसजी ३ ग्राम प्रती १० लिटर पाणी (१५० ग्राम प्रती हेक्टर) किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल ३ मिली प्रती १० लिटर पाणी (१५० मिली प्रती हेक्टर) या पैकी कोणत्याही एका किटकनाशकाची फवारणी स्वच्छ व शांत हवामान परिस्थितीचा अंदाज घेऊन करावी. • पांढऱ्या माशीचा पिल्ले अवस्थेतील प्रादुर्भाव आढळून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास पायरीप्रॉक्सीफेन १० ईसी २० मिली प्रती १० लिटर पाणी (१००० मिली प्रती हेक्टर) किंवा बुप्रोफेझिन २५ एससी २० मिली प्रती १० लिटर पाणी (१००० मिली प्रती हेक्टर) किंवास्पायरोमेसिफेन २२.९ एससी १२ मिली प्रती १० लिटर पाणी (६०० मिली प्रती हेक्टर) या प्रमाणात स्वच्छ व शांत हवामान असताना फवारणी करावी. • पांढऱ्या माशीचा पतंग अवस्थेतील प्रादुर्भाव आढळून आल्यास आणि आर्थिक नुकसान पातळी गाठत असल्यास डा |
| भात | • पिकाच्या गर्भावस्थेनंतर दाणेदार किटकनाशकाचा वापर करु नये. • पाने गुंडाळणारी अळी:- नंत्र खतांचा संतुलित वापर करावा. अळीने गुंडाळलेली नुकसानकारक पाने अळीसह गोळा करून नष्ट करावी. बिव्हेरीया बॅसियाना या जैविक बुरशीचा १.१५ % @२.२५ किलो/हे किंवा अझाडिरेक्टीन ०.१५ % @ ३०-५० मि.ली. किंवा क्वीनॉलफॉस २०% एफ @२५ मि.ली. किंवा इंडोक्साकार्ब १५.८ % @ ४.० मि.ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • तुडतुडे :- धान पिकावर तुडतुडे यांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे तरी त्यांच्या नियंत्रणासाठी मेटारायझियम अनिसोप्ली या जैविक बुरशीचा १.१५ % @ २.५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर या प्रमाणात बांधीमध्ये वापर करावा. तुडतुड्यांची आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडताच नियंत्रणासाठी बुप्रोफेजीन २५ % प्रवाही @१६ मि.ली. किंवा इमिडाक्लोप्रीड १७.८ एस. एल. @२.० मि.ली. किंवा फिप्रोनिल ५ एस.सी. @ २० मि.ली. किंवा फ्लोनीकॅमीड ५० डब्लु.जी. @ ३.० ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • खोडकिडीच्या व्यवस्थापनासाठी हेक्टरी २० या प्रमाणे कामगंध सापळे लावावे. ट्रायकोग्रामा जापोनिकम (ट्रायकोकार्ड) हे परोपजीवी किटक हेक्टरी ५०,००० अंडी या प्रमाणात दर ७ दिवसाच्या अंतराने ३ ते ४ वेळा सोडावे. शेतात १० % किडग्रस्त फुटवे दिसताच क्लोरॅनट्रानीलीप्रोल ०.४ % दाणेदार @ १० कि.ग्रॅ. किंवा कारटॅप हायड्रोक्लोराईड ४ जी @ १८ कि.ग्रॅ. किंवा फीप्रोनिल ०.३ जी @ २५ कि.ग्रॅ. प्रती हेक्टर बांधीमध्ये पाणी |

| पिक | पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | असतांना टाकावे किंवा क्लोरॅनट्रानीलीप्रोल १८.५ % एस.सी. @ ३ मिली. प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • गादमाशी:- कार्बोफ्युरॉन ३ % दानेदार @ २५ किलो ग्रॅम प्रती हेक्टरी बांधीमध्ये ७ ते १० सेमी. पाणी, असतांना वापरावे. बांधीमधील पाणी ४ ते ५ दिवस बांधीबाहेर काढू नये. • रोग व्यवस्थापन: • करपा:- हेक्झाकोनॅझोल ५ % ई.सी. @ २० मि.ली. किंवा मेंकोझेब ७५% प्रवाही @ ३० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • कडाकरपा:- कॉपर हायड्रॉक्साईड ५३.८ % टक्के डी एफ @ ३० ग्रॅम + स्ट्रेप्टोसायक्लीन @ १.५ ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. • आभासमय काजळी:- धान पिकाच्या ५०% फुलोऱ्याच्या वेळेस कॉपर हायड्रास्काईड ७७ % डब्लू.पी. ३० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून दुपारनंतर फवारणी करावी. |

## फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला:

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| अळशी | • बागायती जवस पेरणी ७ नोव्हेंबर पर्यंत करावी. पेरणीपूर्वी प्रती किलो बियाण्यास कार्बेन्डाझीम २ ग्राम किंवा थायरम ३ ग्राम लाऊन बीजप्रक्रिया करावी. त्यानंतर ३ तासांनी अॅझोटोबॅक्टर २० ग्राम व स्फुरद विरघळणारे जीवाणू २० ग्राम प्रती किलो बियाणे या प्रमाणात बीज प्रक्रिया करावी. |
| संत्रा | • फळमाशी- फळमाशीच्या नरांना आकर्षित करण्याकरिता फळमाशी सापळे (मिथिल यूजोनौल) प्रती हेक्टरी २५ या प्रमाणात तोडणीच्या साधारण २ महिने आधीपासून बागेत झाडांवर टांगून ठेवावेत. बागेतील खाली पडलेली फळे वेचून नष्ट करून बाग स्वछ ठेवावी. फळमाशीची कोषावस्था जमिनीत २ ते ३ सेंटिमीटर खोलीपर्यंत असते. झाडाखालील माती हलवून किंवा निंदून घ्यावी. • फळातील रस शोषण करणारा पतंग- संत्रा रस शोषक पतंग किडीसाठी संत्रा पिकाच्या व्यतिरिक्त असलेल्या यजमान तणाचा नाश करावा उदा. गुळवेल, वासनवेल, चांदवेल इ. यजमान तणावर या किडीची अळी अवस्था राहते. साधारणतः सायंकाळीच्या वेळी (७ ते रात्री ११) या कालावधी मध्ये बागेच्या बांधावर गवत पेटवून धूर करावा. फळ पक्वतेच्या वेळी बागेच्या चार हि कोपऱ्यामध्ये तसेच मध्यभागी एक मर्क्युरी प्रकाशाचे दिवे लावावेत आणि दिव्यांच्याखाली पसरट भांड्यामध्ये केरोसीन ओतून ठेवावे. रसशोषण करणाऱ्या पतंगाकरिता विषारी आमिषे तयार करुन बागेत ठेवावी. या करीता मॅलॅथिऑन ५० ईसी २० मिली + २०० ग्रॅम गुळ + खाली पडलेल्या फळांचा रस ( ४०० ते ५०० मिलि ) २ लिटर पाण्यात मिसळून प्रत्येकी दोन आमिषे रुंद तोंडाच्या दोन बाटल्यात टाकून प्रत्येक २५ ते ३० झाडांमध्ये एक या प्रमाणात ठेवावे. फळ हिरव्या रंगामधून पिवळसर रंगामध्ये रुपांतर होत असताना १०-१५ दिवसाच्या अंतराने फळ तोडणी होईपर्यंत निंबोळी तेल (निम ऑईल) किवा मिनरल ओईल १० मिली प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. बागेतील खाली पडलेली फळे वेचून खड्यात पुरून बाग स्वछ ठेवावी. • (नोंद: • लेबल क्लेम शिफारस नाही; संशोधनावर आधारित आहे, # केंदीय कीटकनाशक मंडळ, नवी दिल्ली शिफारस) (स्त्रोत: एआयसीआरपी ऑन फ्रुट, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला). • कोलेटोट्रीकम स्टेम एंड रॉट किंवा देठ सुकणे - कोलेटोट्रीकम स्टेम एंड रॉट मुळे होणाऱ्या फळगळसाठी बोर्डेक्स ०.६ टक्के मिश्रणाची किवा कॉपर ऑक्सिक्लोराईड ५० डब्लूपी * २.५ ग्रॅम प्रति लिटर किंवा अझोक्सस्ट्रोबिन + डायफेनकोणाझोल १ मिलि प्रति लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. • ग्रेसी स्पॉट- खाली पडलेल्या पानांचा खच यांचे विघटन जलद गतीने होण्याकरिता कडीकचरा विघटन करणाऱ्या ईतर उपयोगी बुरशींचा (शेणखता सह मिश्रित बायो-डिकंपोझर (१ किलो / झाड) वापर |

| फळे आणि भाजीपाला पिक | फळे आणि भाजीपाला पिक निहाय सल्ला |
|---|---|
| | करावा. साधारणतः झायनेब* (२० ग्रॅम / १० लि. पाणी) किवा होर्टीकल्चरल मिनरल ऑइल @ २% (२०० मिलि / १० लिटर पाणी) किवा पूर्व मिश्रित बुरशीनाशक हेक्साकोनाझोल ४% + झायनेब ६८ % डब्लुपी @ १५ ग्रॅम / १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. मिनरल ऑइल किवा बुरशींनाशकांचा वापर केल्याने पानामध्ये बीजाणूंचा प्रवेश कमी होतो तसेच बीजाणूंची उगवण कमी होते. बुरशींचा संसर्ग झाला असल्यास लक्षणांच्या विकासास प्रतिबंध किंवा विलंब होतो त्याच बरोबर तेलकट चट्टे यांची तीव्रता कमी दिसून येते. • ब्राऊन रॉट (फळावरील तपकिरी कूज) - सर्वप्रथम झाडांवर गळून पडलेल्या पानांची व फळांची विल्हेवाट लावावी ती शेतात तसीच राहू देऊ नये अन्यथा या रोगाची तीव्रता वाढण्यास मदत होऊन संक्रमण जलद गतीने होते. वाफा स्वच्छ ठेवावा. फळबागेत फळांचे ढीग कुठेही ठेवू नका कारण ते रोगाचे प्रसार करण्याचे कार्य करतात. फायटोफ्थोरा बुरशीमुळे होणाऱ्या पानगळ व फळावरील तपकिरी कुज चा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाय म्हणून संपूर्ण झाडावर फासिटील ए.एल.* २.५ ग्रॅम किवां कॉपर ऑक्सीक्लोराईड * ५० डब्लूपी ३ ग्रॅम प्रती लिटर पाणी घेऊन फवारणी करावी. फवारणी करतांना झाडाच्या परिघातामध्ये सुद्धा फवारणी करावी जेणेकरून खाली पडलेली फळे उचललेली नसल्यास त्यावर |
| मिरची | • तापमानातील चढ उतार व उच्च आद्रतेमुळे मिरची पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी हेक्साकोनाझोल ७५ % डब्ल्यूजी ६६.७ ग्राम ग्रॅम किंवा टेब्युकोनाझोल २५ % डब्ल्यूजी @ ५००-७५० ग्रॅम किंवा अझॉक्सीस्ट्रोबिन ८.३ % + मॅन्कोझेब ६६.७ % डब्ल्यूजी @ १५०० ग्रॅम किंवा बोस्कालीड २५.२ % + पायराक्लोस्ट्रोबिन १२.८ % डब्ल्यूजी @ ६०० ग्राम किंवा कार्बेन्डाझिम १२ % + मॅन्कोझेब ६३ % डब्ल्यूजी @ ७५० ग्रॅम किंवा क्रेसॉक्सिम - मिथाइल १५ % + क्लोरोथॅलोनिल ५६ % डब्ल्यूजी @ १००० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल १० % डब्ल्यूपी + सल्फर ६५ % डब्ल्यूजी @ १२५० ग्रॅम किंवा टेबुकोनाझोल ५० % + ट्रायफ्लॉक्सिस्ट्रोबिन २५ % डब्ल्यूजी @ २५० ग्राम प्रती हेक्टर ५०० लिटर पाणी या प्रमाणात मिसळून या पैकी कोणत्याही एका बुरशी नाशकाची स्वच्छ हवामन परिस्थिती असताना फवारणी करावी. |

## पशुधन विषयक निहाय सल्ला:

| पशुधन विषयक | पशुधन विषयक निहाय सल्ला |
|---|---|
| गाय | • जनावरांसाठी पोषक चारा उपलब्धतेसाठी लुसर्न आणि बरसीम या चारा पिकाची लागवड करावी. जनावरांचा गोठा हा स्वच्छ, कोरडा व हवेशीर ठेवा. जंतनाशकाची मात्रा ३ महिन्यांच्या आधी केली नसल्यास जनावरांना जंतनाशकाची मात्रा द्यावी. गोठ्याचे निर्जंतुकीकरण २ टक्के फार्मेलिन चे द्रावण तयार करून करावी. जनावरांमध्ये अतिसारआणि अपचन टाळण्यासाठी लहान आणि मोठ्या जनावरांना कोरडा चाऱ्याचा आहारात समावेश करावा. चारा पिकासाठी शिफारस केलेली रासायनिक खतांची मात्रा द्यावी. |
| बकरा किंवा बकरी | • शेळ्यांना पायखुरी/तोंडखुरी, घटसर्प आणि आंत्रविषार टाळण्याकरिता पशुवैद्यकीय अधिकाऱ्याच्या सल्ल्याने लसीकरण करावे. जनावरांना स्वच्च्छ आणि थंड पाण्याची सोय करावी. |

## इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला:

| इतर (माती / जमीन तयार करणे) | इतर (माती / जमीन तयार करणे) निहाय सल्ला |
|---|---|
| सामान्य सल्ला | • लसून, मुळा, मेथी, पालक, श्रावण घेवडा, बटाटा,गाजर, गवार, वाटणा इत्यादी भाजीपाला पिकाची लागवड करावी. |